# वाचन, लेखनाचे शेड्युल्ड ठरलेलेच...

## डॉ. अशोक चौसाळकर यांचा सवयीला ब्रेक नाही : स्वयंपाकाचीही जपताहेत आवड

### » संचारबंदीतले दिवस

**डॉ. अशोक चौसाळकर राजकीय विश्लेषक. शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख. सेवानिवृत्त होऊन त्यांना तब्बल दहा वर्षे उलटली. नेहरू सदरा, पांढरी पँट व खांद्यावर शबनम पिशवी असा त्यांचा पेहराव. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याच्या व्रताला त्यांनी पूर्णविराम दिलेला नाही. आर. के. नगरातून विद्यापीठात त्यांची फेरी चुकत नाही. मुलगा शिशिर मुंबईत साऊंड इंजिनिअर म्हणून काम करतोय. त्याला भेटण्यासाठी ते पाच मार्चला मुंबईतल्या अंधेरीत गेले. 'कोरोना'चा फास आवळल्याने त्यांना घर सोडता येत नाही. त्याची फारशी फिकीर ते करत नाहीत. स्वयंपाक बनविण्यासह वाचन, लेखनाचे त्यांचे शेड्युल्ड बिघडलेले नाही.**

**- संदीप खांडेकर**

डॉ. चौसाळकर मुंबईत अडकलेत. त्यांची पत्नी सिंगापुरात मुलीकडे आहे. अंधेरीतल्या घरात चौसाळकर सर शिशिरच्या मदतीत गुंतले आहेत. सकाळी सात वाजता उठल्यानंतर सरांची किचनमध्ये रेलचेल सुरू होते. चहा, नाश्ता, भाजी व वरण सर बनवतात. शिशिरचा चपात्या लाटण्यात हात चालतो. दहापर्यंत घरगुती कामे आटोपून सरांचा वाचन विश्वात प्रवेश होतो. मोबाईलवर वर्तमानपत्रांवर नजर भिरभिरल्यावर सरांचा लेखन प्रपंच सुरू होतो. योजना मासिकासाठी सरांनी 'केरळ : केंद्र-राज्य संबंध' विषयावर लेख लिहिला आहे. प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : धर्म अणि तत्त्वज्ञान' विषयावर पुस्तक लिहिले आहे. त्याची प्रस्तावना लिहिण्याचा मान चौसाळकर सरांकडे आहे. '१९६० नंतरचा महाराष्ट्र' पुस्तक



**लिखाणात मग्न असलेले डॉ. अशोक चौसाळकर.**

प्रकाशित होणार आहे. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचा उदय व ऱ्हास का होतो, या अनुषंगाने लिहिण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी व जनता पक्षाच्या उदय व ऱ्हासाची कारणमीमांसा करण्यासाठी त्यांच्या लेखणीतून शब्द कागदावर उतरत आहेत.

प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी 'आधुनिक भारतीय राजकीय विचार' पुस्तक लिहिले आहे. त्याची प्रस्तावना लिहिण्याचे कामही सरांकडेच आहे. अमर्त्य सेन लिखित 'अर्ग्युमेंटेटिव्ह इंडियन' पुस्तक सरांनी ८ मार्चला वाचायला घेतले होते. ३७५ पानांचा फडशा पाडून ते 'शरदचंद्र चटर्जी की मौलिक कहांनिया,' रशियन कथाकार अंतोन्हव्ह चेकॉव्ह लिखित 'सिलेक्टेड स्टोरिज ऑफ अंतोन्हव्ह चेकॉव्ह,' मंटोच्या निवडक कथा, व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'वावटळ,' व 'सीताराम एकनाथ,' भाऊ पाध्ये यांचे 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर' कादंबरीचे वाचन ते क... सायंकाळी पुन्हा जेवणाच्य... व्यस्त होतात. जेवण उरकू... सहा वाजता मात्र दोन... थिएटर करतात. दररोज एक जुना चित्रपट पाहायचाच, असा त्यांनी चंग बांधलाय. 'बूटपॉलिश', 'हम दोनो', 'दो बिघा जमीन', 'माया', 'छाया', 'दो आंखे बाराह हाथ' आदी चित्रपट त्यांनी यूट्युबवर पाहिले आहेत. रात्री वाचन व लेखनाच्या सवयीला सर ब्रेक देत नाहीत. 'आयुष्य गांभीर्याने नव्हे मजेत जगायला हवे. म्हणून निव्वळ मनोरंजन करणारे चित्रपट पाहतो,' असं ते आवर्जून सांगतात.


# ‘कौशल्य विकास’ची मागणी वाढणार

## ऑनलाईन कोर्सेसचा ट्रेंड : अभ्यासक्रम, अध्यापनाचेही प्राधान्य बदलणार

**‘कोरोना’ विषाणूमुळे देशभरात ‘लॉकडाउन’ सुरू आहे. हे ‘लॉकडाउन’ उठल्यानंतर अनेक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात बदल घडणार आहेत. अगदी सामाजिक बहिष्कारापासून नववर्चस्ववादही उदयास येईल. शिक्षण, पर्यावरण यांसह विविध क्षेत्रांतील बदलांचा वेध घेणारी मालिका आजपासून...**

**ओंकार धर्माधिकारी** : सकाळ वृत्तसेवा



**कोल्हापूर, ता. ९ : ‘लॉकडाउन’मुळे विद्यापीठे बंद झाली, परीक्षा पुढे गेल्या. देशातील ३७ दशलक्ष विद्यार्थ्यांना याचा फटका बसला. मात्र, याच काळात तरुणाईने ऑनलाईन अभ्यासक्रम आत्मसात करण्यावर भार दिल्याचे समोर आले आहे. विविध कोर्स असणाऱ्या केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या स्वयंपोर्टलला एका दिवसांत १९ हजार हिट्स मिळाल्या. शिवाय कोर्सेरा, एनपीटीईएल यांच्याकडील विविध कोर्सेसनाही प्रतिसाद वाढत आहे.**

अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शास्त्र महाविद्यालयांनीही ऑनलाईन अध्यापनाचा प्रारंभ केला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानेही (यूजीसी) ऑनलाईन अभ्यासक्रम बनवणे आणि अध्यापनाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे आगामी काळात ऑनलाईन कोर्सेस अधिक वाढतील, असे चित्र आहे.

‘लॉकडाऊन’मध्ये विद्यार्थी, नोकरदार आणि विविध प्रकारचे व्यावसायिक यांनी ऑनलाईन कोर्स करण्याला प्राधान्य दिल्याची बाब समोर आलीय. यामध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपिंग, अॅप आणि वेब डिझायनिंग, स्टार्टअप, व्यवसाय वाढीसाठी उपयोगी पडणारे कोर्सेस करण्याकडे कल असल्याचे दिसते. आर्टिफिशल इंटेलिजन्सवर आधारित अॅप बनवायला शिकण्याकडेही कल दिसून येत आहे. अभियांत्रिकी आणि व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयांनी विविध अॅपचा वापर करून ऑनलाईन अध्यापन सुरू केले. ‘स्वयं’ पोर्टलला एकाच दिवशी १९ हजार हिट्स मिळाल्या असून यावर १९०० कोर्सेस उपलब्ध आहेत. परदेशातूनही विद्यार्थी ऑनलाईन कोर्स करतात. ‘कोर्सेरा फॉर कॅम्पस’ पोर्टलवरही विद्यार्थ्यांनी सर्टिफिकेशन कोर्सेस केले आहेत. एनएसबीसीच्या मान्यताप्राप्त कोर्सेसनाही अधिक मागणी असून, त्यातून रोजगाराच्याही संधी उपलब्ध आहेत. ‘लॉक डाऊन’मधील या गोष्टींचा अभ्यास केल्यास भविष्यकाळात शिक्षणाची दिशा बदललेली दिसेल. कौशल्य विकास अभ्यासक्रमांकडेही कल वाढेल. प्रत्येक जण क्षमतेनुसार कोर्स निवडेल आणि रोजगाराभिमुख होण्याचा प्रयत्न करेल.

> **जगातील नामांकित विद्यापीठांनी ऑनलाईन अध्यापन पद्धती स्वीकारली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना वेळेनुसार, आवश्यकतेनुसार आणि कमी खर्चात शिक्षण घेणे शक्य होते. रोजगार निर्मितीलाही चालना मिळते. यासाठी विद्यापीठांनी ऑनलाईन अध्यापनाला महत्त्व द्यावे.**
>
> – **डॉ. बी. एम. हिर्डेकर**, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

> **ऑनलाईन कोर्स करताना त्यांची प्रमाणितता पाहिली पाहिजे. योग्य कालावधीच्या कोर्सची निवड केली पाहिजे, जेणेकरून आपल्या कोर्सचा रोजगाराच्या किंवा व्यवसायाच्या दृष्टीनेही उपयोग होईल. अनेक अभ्यासक्रम ऑनलाईन उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी उपयोग करणे गरजेचे आहे.**
>
> – **डॉ. आर. व्ही. कामत**, विभागप्रमुख, संगणकशास्त्र, शिवाजी विद्यापीठ.

### विद्यापीठीय अभ्यासक्रम पोर्टलवर

विद्यापीठ अनुदान आयो 'मॅसिव्ह ऑनलाईन ओप कोर्सेस' (मूक) पोर्टल सु... केले आहे. यावर देशभरातील प्राध्यापक हे त्यांच्या विषयांचे अभ्यासक्रम पाठवतात. पोर्टलवरून अध्यापन कौशल्य आत्मसात करता येते. तसेच विविध विषयांची अद्ययावत माहितीही मिळते. सर्वच विद्यापीठांनी उच्च शिक्षणाशी संबंधित अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने शिकवण्यासाठीच्या स्वरुपात बनवण्यासही सांगण्यात आले आहे.

# विद्यापीठांमध्ये सुसूत्रता ठेवा

## राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या सुचना : व्हिसीद्वारे घेतला कुलगुरुंकडून आढावा

प्रतिनिधी

कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी सायंकाळी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. यामध्ये आगामी वर्षातील शैक्षणिक धोरण, यंदाच्या रखडलेल्या परीक्षा, त्यांचे निकाल यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वच विद्यापीठांमध्ये सुसूत्रता ठेवा अशा सुचना राज्यपाल कोश्यारी यांनी कुलगुरूंना दिल्या आहेत.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देश लॉकडाउन करण्यात आला आहे. विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या विविध परीक्षांना २७ मार्चपासून प्रारंभ होणार होता. या परीक्षाही स्थगीत करण्यात आल्या आहेत. यामुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षाचे नियोजनही कोलमडले आहे. या पार्श्वभूमीवर राज्यपालांनी कुलगुरुंशी संवाद साधला. सुमारे २ तास ही चर्चा सुरु होती.



यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरु डॉ. डि. टी. शिर्के, परिक्षा नियंत्रक गजानन पळसे उपस्थित होते.

राज्यपालांनी २०२० – २०२१ या शैक्षणिक वर्षातील नियोजनाचा आढावा घेतला. तसेच पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षांचे व त्यांच्या निकालाचे नियोजन कोणत्या प्रकारे केले आहे. सद्य स्थितीला विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी ई – लर्निंगची सोय केली आहे काय?, तसेच एन. एस. एस.च्या विद्यार्थ्यांचे कोरोना लढाईतील सहभाग घेतला आहे? आदींविषयी माहिती घेतली.

विद्यार्थ्यांना ई – कंटेटची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्याचसोबत आयसोलेशन वॉर्डसाठी तंत्रज्ञान विभागाचे हॉस्टेल प्रशासनाकडे दिले आहे. लॉकडाउनच्या काळात नागरीकांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी विद्यापीठातर्फे फोन इन समुपदेशन केंद्र सुरु केल्याची माहिती दिली. तसेच एन.एस.एस मधून १ हजार विद्यार्थी जिल्हा कोरोना केंद्राच्या मदतीला तैनात केले आहेत. त्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

### कुलगुरुंचा समावेश समितीमध्ये

उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी यंदा रखडलेल्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी ६ सदस्यांची समिती सोमवारी नेमली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचा समावेश करण्यात आला आहे. याचसोबत मुंबई, पुणे, एस. एन. डी. टी विद्यापीठाचे कुलगुरु, तंत्रशिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालकांचा समावेश करण्यात आला आहे.

तरुण भारत Fri, 10 April 2020
https://epaper.tarunbharat.com/c/50809096

अमित गद्रे





रंकाळा तलावाचे नेहमी हिरवट दिसणारे पाणी आता निळसर दिसत आहे. दुसऱ्या छायाचित्रात प्रदूषणात कमालीची घट झाल्याने पंचगंगा नदीचा अतिशय स्वच्छ तळ दिसू लागला आहे.

# प्रदूषण घटले, शहर सुखावले

## मोकळा श्वास; धोका पातळी ९५ टक्क्यांपर्यंत कमी


Anuradha.kadam
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT


कोल्हापूर : वहनांच्या गर्दीने कोंडलेले रस्ते, सतत भरुन वाहणारा दाभोळकर कॉर्नर सिग्नल, स्टेशन रोड, बिंदू चौक, गंगावेश चौक इथे सध्या गाड्यांच्या हॉर्नचे कर्कश्श आवाज नव्हे तर पक्ष्यांचा गुंजारव, किलबिलाट ऐकू येतोय. रंकाळ्याच्या काठावर बसल्यानंतरही इथल्या प्रवाहाचा आवाज ऐकू येतो हे पहिल्यांदाच समजतेय. नागरिकांची गर्दी, वाहनांच्या आवाजाने हरवून गेलेल्या शहरात झाडांच्या पानांची सळसळ सहजपणे ऐकू येते. वाऱ्याची झुळूकही बोलकी असते हे उमगायला लागले आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागू केलेल्या संचारबंदीने कोल्हापुरातील हवा आणि ध्वनी प्रदूषणाची पातळी ९५ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. कोलाहल, गोंगाट यांच्या विळख्यातील रस्ते, चौकांनी मोकळा श्वास घेतला आहे. संचारबंदीमुळे हे काहीसे सुखद चित्र दिसत आहे.



शांत असलेला महाद्वार रोड परिसर.

### हवेतील धूलिकण व ध्वनी गोंगाट ५ टक्क्यांवर

दाभोळकर कॉर्नर भागांमध्ये हवेतील धूलिकणांचे प्रमाण जवळपास ६६ टक्के असते. सध्या हे प्रमाण ७ टक्के आहे अंबाबाई मंदिर परिसरात हवेतील धूलिकण कणांचे प्रमाण हे ५५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर आले आहे. शिवाजी विद्यापीठ परिसरात हवा प्रदूषित होण्याचे प्रमाण इतरवेळी ४१ टक्के असते. मात्र सध्या याचे प्रमाण चार टक्के नोंदवले गेले आहे. वाहनांमुळे रोज कोल्हापूर शहरात महत्त्वाचे रस्ते आणि चौकांत सर्वाधिक धोका असतो. सरासरी दीड लाख वाहने रस्त्यावर असतात. याव्यतिरिक्त औद्योगिक क्षेत्रामध्ये मशिनरीचा आवाज सतत सुरू असतो. सर्वाधिक ध्वनी व हवा प्रदूषणाला या दोन गोष्टी कारणीभूत असून वाहनांच्या अनावश्यक वापरावर निर्बंध आणण्याची मागणी आता पर्यावरण तज्ज्ञांकडून होत आहे.

- २२ मार्चपासून सुरु असलेल्या संचारबंदीच्या काळामध्ये गेल्या अठरा दिवसांत महत्त्वाचे चौक आणि रस्ते याठिकाणी ची गर्दी जवळपास ९० टक्के कमी झाल्यामुळे या परिसराने मोकळा श्वास घेतला आहे. दाभोळकर कॉर्नर, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसर, शिवाजी विद्यापीठ, रंकाळा, उद्यम नगर, लक्ष्मीपुरी या परिसरात ध्वनी व हवा प्रदूषण ९५ टक्क्यांपर्यंत घटले आहे.

करोना इफेक्ट
मोकळे आकाश

- काही भागांमध्ये नागरिकांकडून कचरा जाळण्याचे प्रमाण गेल्या काही दिवसांमध्ये वाढले होतं. याचाही परिणाम हवा प्रदूषणावर होत होता. सध्या नागरिकांच्या घरापर्यंत येणाऱ्या कचरा गाडीतून कचरा उठाव होत आहे. त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट योग्य प्रकारे लावली जात आहे. याचाही परिणाम हवा प्रदूषण घटण्यावर झाला आहे.



“

सध्या कोल्हापूर शहरातील व जिल्ह्यातील काही भागांमधील प्रदूषण पातळी घटल्याची नोंद नक्कीच समाधानकारक आहे. प्रदूषणाचा परिणाम सामाजिक जीवनावरही होत असतो, तसेच तो नागरिकांच्या आरोग्यावरही होतो. पर्यावरणशास्त्र विभागाने सातत्याने शहरातील प्रदूषणाबाबत पाहणी व अहवाल सादर केला आहे. आता ही सामाजिक गरज बनली असून प्रत्येकाने यासाठी आपले योगदान देणे आवश्यक आहे.

- डॉ. पी. डी. राऊत, विभागप्रमुख, पर्यावरण शास्त्र, शिवाजी विद्यापीठ

प्रदूषणाचा वाढता टक्का हा निसर्गावर मानवाने केलेल्या हस्तक्षेपाचा धोकादायक परिणाम होता. सध्याचे चित्र पाहता हवा आणि ध्वनिप्रदूषण लक्षणीय घटले आहे. तसेच पृथ्वी कंप पावण्याची क्षमताही खूप कमी झाली आहे. घटलेल्या प्रदूषण पातळीमुळे तापमानातही घट जाणवत आहे. आगामी काळात उन्हाची तीव्रता कमी होईल. पावसाचे चक्र योग्य रीतीने फिरेल असे दिसून येत आहे. भविष्यात वाढत्या वाहन संख्येवर नियंत्रण ठेवणे, नदीपात्र, जंगल, डोंगर यांच्यापासून मानवी आयुष्य दूर ठेवणे गरजेचे आहे. सध्याच्या स्वच्छ हवेचा परिणाम वन्यजीव आणि जैवविविधता यांनाही पोषक असा आहे.

- डॉ. मधुकर बाचुळकर, पर्यावरण तज्ज्ञ

- गेल्या अठरा दिवसांपासून शहरातील औद्योगिक क्षेत्र बंद आहे. जिल्ह्यातील बहुतांश कारखाने बंद आहेत. हॉटेल्स, बेकरी यांसारखे उद्योग बंद आहेत. येथून उत्पादनाच्या निर्मितीप्रक्रिया बंद राहिल्याने येथून बाहेर पडणारा धूर थांबला आहे. परिणामी हवेतील प्रदूषित कण गेल्या १८ दिवसांपासून हवेमध्ये न मिसळल्याने हवा स्वच्छ आणि आरोग्यदायी बनली असल्याचा निष्कर्ष पर्यावरण तज्ज्ञांनी काढला आहे.



- शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्यावतीने केलेल्या पाहणीत करोना संसर्ग प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र सरकारने लागू केलेल्या संचारबंदीच्या काळात शहरातील हवा प्रदूषणामध्ये ९५ टक्के घट झाल्याचे दिसून आले. हवेच्या मापनामध्ये प्रदूषित घटकांचे प्रमाण घटल्याचे निदर्शनास आले आहे. सध्या पर्यावरण विभागातर्फे जल स्रोताच्या प्रदूषणाची पातळी मोजण्याचाही अभ्यास सुरू आहे.

# विद्यापीठात होणार कोरोना टेस्टिंग लॅब

## कुलगुरूंकडून जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव सादर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तत्काळ संशयित रुग्णांची तपासणी होऊन निदान व्हावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने कोरोना टेस्टिंग लॅब उभारण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केला आहे.

कोरोना विषाणूचा संसर्ग वाढू नये, यासाठी जिल्हा प्रशासन आवश्यक सर्व खबरदारी घेत आहे. यात सामाजिक संस्था, संघटना मोलाचे सहकार्य करीत आहेत. जिल्हा प्रशासनाने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठाने यापूर्वीच नागरिक, विद्यार्थ्यांसाठी फोन-इन समुपदेशनाची सुविधा सुरू केली आहे. विद्यापीठातील विद्यार्थी वसतिगृहातील १ हजार बेड कोरोना रुग्णांसाठी आयसोलेशन व आयसीयू रुग्णालय उभारण्यास दिले आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी कोरोना टेस्टिंग लॅब उभारण्याबाबतचा ३ कोटी रुपयांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी दौलत देसाई यांना दिला आहे. यात टेस्टिंग लॅब उभारणीसाठी 'आयसीएमआर'ची मानके पूर्ण करण्यासाठी विविध घटकांची आवश्यकता आहे. यात टेस्टिंग लॅब 'एनएबीएल'ची ॲक्रिडेटेड असणे महत्त्वाचे आहे. यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. बीएसएल-३ या संसर्ग हाताळण्याची सुविधा असली पाहिजे. 'डीएचआर' व 'एनआयव्ही'च्या मंजुरीने 'आयसीएमआर'कडे प्रस्ताव पाठवणे गरजेचे आहे. जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने हा प्रस्ताव आरोग्य विभाग, राज्य सरकारच्या परवानगीनंतर केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.

> महाराष्ट्रात कोरोना टेस्टिंग लॅबची संख्या कमी आहे. कोरोना रुग्णाचे निदान व्हायला वेळ लागत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून शिवाजी विद्यापीठाने कोरोना टेस्टिंग लॅब उभारण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे. विद्यापीठात लॅबसाठी मूलभूत उपकरणांबरोबर तज्ज्ञ आहेत. तांत्रिक कारणास्तव लॅब उभी करण्यास अडचणी आल्यास जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने ही उपकरणे व तज्ज्ञांची सुविधा मान्यताप्राप्त संस्थेस देण्यास विद्यापीठाची तयारी आहे.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे,**
>
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# शिवाजी विद्यापीठ वसतिगृहातील साहित्य पॅकिंगला सुरुवात

**कोल्हापूर :** कोरोना व संशयित रुग्णांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग विद्यार्थी-विद्यार्थिनी वसतिगृह ताब्यात घेण्यास प्रारंभ झाला आहे. गुरुवारी सकाळपासून खोल्यांमधील साहित्य व्हिडीओ शूटिंग करून पॅकिंग करण्यात येत आहे. वसतिगृह इमारतीमधील सर्व खोल्यांमधील साहित्य काढून ट्रंकमध्ये व्यवस्थित ठेवणे, गाद्या गुंडाळून त्याचा रूम नंबर नमूद करून इतर ठिकाणी व्यवस्थित सुरक्षित ठेवण्यात यावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. 'डीओटी'वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या वसतिगृहातील १२५ खोल्यांमधील साहित्य हलविण्यात येणार आहे. साहित्य वेगवेगळे करून वर्कशॉपमध्ये ठेवण्यात येणार आहे. साहित्य पॅकिंगला तीन दिवस लागतील, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# क्वारंटाईनसाठी दिले विद्यापीठाने वसतिगृह

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता.९ : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाचे (डी.ओ.टी) वसतिगृह जिल्हा प्रशासनाला क्वारंटाईनसाठी देण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला. विद्यापीठाने क्वारंटाईनसाठी स्वतंत्र समिती नेमली असून या समितीच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामे करण्यात येतील, अशी माहिती कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ प्रशासनास प्रतिसाद देत तंत्रज्ञान विभागाची वसतिगृहे क्वारंटाईनसाठी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली. या वसतिगृहांची पाहणी आरोग्य विभाग, पोलिस प्रशासन यांनी केल्यानंतर येथे क्वारंटाईन विभाग करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार आज मुलींचे वसतिगृह रिकामे करण्यात आले. यामधील सर्व साहित्य स्टोअर विभागात ठेवण्यात आले आहे. कुलसचिव विलास नांदवडेकर यांच्या अध्यक्षतेखाली यासाठी विविध समित्या बनवल्या असून, त्यानुसार हे काम केले जाणार आहे. या वसतिगृहामध्ये १२५ खोल्या असून तेथे ५५० बेडचे क्वारंटाईन होऊ शकते. असे कुलगुरूंनी सांगितले.

# नॅनो बायो विषयावर १३ पासून आंतरराष्ट्रीय व्टिटर परिषद

**कोल्हापूर :** न्यू कॉलेज, दादा पाटील महाविद्यालय (कर्जत) आणि शिवाजी विद्यापीठातर्फे १३ एप्रिलपासून नॅनो बायो विषयावरील आंतरराष्ट्रीय व्टिटर परिषदेचे आयोजन केले आहे. शासनाच्या वर्क फ्रॉम होम आवाहनाला प्रतिसाद म्हणून सदर परिषदेचे आयोजन केले आहे. यात नॅनो तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आणि कोरोना विषाणूला नियंत्रित करण्याबाबतच्या पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. परिषदेमध्ये जगभरातून १७५ हून अधिक संशोधकांनी सहभाग नोंदवला आहे. परिषदेत जास्तीत जास्त संशोधकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले आहे.

# ऑनलाइन परिषद

कोल्हापूर : लॉकडाउनच्या पार्श्वभूमीवर न्यू कॉलेजतर्फे ऑनलाइन 'आंतरराष्ट्रीय ट्वीटर परिषद आयोजित केली आहे. नॅनो बायो टेक्नॉलॉजी देशातील ही दुसरी ट्वीटर परिषद असल्याचे संयोजकांनी सांगितले. १३ ते १५ एप्रिल या कालावधीत परिषद होईल. न्यू कॉलेज, दादा पाटील कॉलेज कर्जत आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने परिषद होईल. परिषदेमध्ये नॅनो तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आणि करोना विषाणूला नियंत्रित करण्याच्या विषयावर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. परिषदेत आतापर्यंत १७५ संशोधकांनी सहभाग घेतला आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने परिषदेचे उद्घाटन होईल, अशी माहिती न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील यांनी दिली.

# विद्यापीठात आज ऑनलाईन कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या पंडित मदनमोहन मालवीय शिक्षक व शिक्षणविषयक राष्ट्रीय अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठात कार्यरत सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्रातर्फे शुक्रवारी (दि. १०) सायबर सिक्युरिटीविषयक एकदिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

जगभरात कोरोना विषाणूचा उद्रेक झाल्याने भारतात १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊन घोषित करण्यात आला आहे. सर्व आस्थापनांनी कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम'चा सल्ला दिला आहे. त्यामुळे डिजिटल साधनांचा आधार घेऊनच काम करावे लागत आहे. ऑनलाईन व्यवहारात वाढ झाल्याने सायबर व फिशिंग हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याची प्रकरणे समोर येत आहेत. यासंदर्भात जनजागृती व योग्य सुरक्षाविषयक दक्षता कशी घ्यावी, याची माहिती कार्यशाळेत देण्यात येणार आहे. कार्यशाळेत इन्ट्रोडक्शन टू सायबर सिक्युरिटी, सायबर ॲटॅक्स क्लासिफिकेशन व स्मार्टफोन अँड पेमेंट सिक्युरिटी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी केले आहे.

# न्यू कॉलेजमध्ये १३ पासून आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

न्यू कॉलेज, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ते १५ एप्रिलदरम्यान नॅनो बायो विषयावरील भारतातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. परिषदेत नॅनो तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान व कोरोना विषाणूला नियंत्रित करण्याच्या विषयावर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. ही परिषद ऑनलाईन असल्याने यात घरात बसून सहभागी होता येणार आहे.

२१ दिवसांच्या लॉकडाऊन काळातील भारतातील ही एकमेव परिषद आहे. परिषदेमध्ये जगभरातून १७५ च्या वर संशोधकांनी सहभाग नोंदवला आहे. परिषदेत संशोधकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन परिषदेचे चेअरमन न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले आहे.